सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
बुधवार, दि. २९ एप्रिल २०२६   http://epaper.citynewssuperfast.com

# उन्हाळ्याच्या सुट्टीत पुणे मुंबई जाणे होईल सोपे !

## मे महिन्यात प्रवाशांच्या सुविधेसाठी धावतील सहा गाड्या

प्रतिनिधी २९ एप्रिल



**अकोला :** उन्हाळ्याच्या सुट्ट्या आणि त्यातच विवाह समारंभाची धूम असल्यावर बाहेरगावी जायचे म्हटल्यावर कोणाच्याही अंगावर काटा येतो. कारण आधीच गाड्यांना भरपूर गर्दी असते, गाड्यांचे आरक्षण फुल झालेले असते. अशा वेळेस परिवारासोबत रेल्वेने पुणे मुंबई जायचे म्हणजे अशक्यप्राय होऊन जाते. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमुळे रेल्वे गाड्यांना होणारी प्रवाशांची तुफान गर्दी आणि वेटिंग लिस्ट चा वाढता आकडा लक्षात घेता मध्य रेल्वेने प्रवाशांची अतिरिक्त मागणी पूर्ण करण्यासाठी मुंबई -नागपूर आणि पुणे- नागपूर दरम्यान सहा वीकेंड स्पेशल फेऱ्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे यामध्ये मुंबईसाठी चार आणि पुण्यासाठी दोन विशेष फेऱ्यांचा समावेश आहे यामुळे प्रवाशांच्या गर्दीला आळा बसणार आहे.

नागपूर मुंबई विकेंड स्पेशल च्या राहतील चार फेऱ्या

गाडी क्रमांक ०१० २१- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून शुक्रवार १ मे आणि रविवार ३ मे २०२६ रोजी मध्यरात्री ००:३० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी दुपारी १५ : ४५ वाजता नागपूरला पोहोचेल. तर गाडी क्रमांक ०१०२२ नागपूर येथून शुक्रवार १ मे आणि रविवार तीन मे २०२६ रोजी रात्री २१:४० वाढदिवसाच्या सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १ वाजता ला मुंबईला पोहोचेल. या गाडीला दादर ठाणे कल्याण मनमाड जळगाव भुसावळ मलकापूर शेगाव अकोला मुर्तीजापुर बडनेरा धामणगाव आणि वर्धा थांबा राहील

पुणे नागपूर पुणे विकेंड स्पेशल (२ फेऱ्या) गाडी क्रमांक ०१४६७ पुणे इथून शुक्रवार १ मे २०२६ रोजी दुपारी १५:५० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ०८:०५ वाजता नागपूरला पोहोचेल. गाडी क्रमांक ०१४६८ नागपूर येथून रविवार ३ मे २०२६ रोजी सकाळी ७ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी रात्री २३:३० वाजता पुण्याला पोहोचेल या गाडीला उरुळी, दौंड, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, बडनेरा, धामणगाव, आणि वर्धा थांबा राहील. आरक्षण खिडक्यांवर गाड्यांचे तिकीट उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली

# श्याम बाबांच्या जयघोषाने दुमदुमली राजराजेश्वर नगरी

## ♦ दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी

प्रतिनिधी २९ एप्रिल



**अकोला :** शहरातील गीता नगर येथील श्री रामदेव बाबा आणि श्याम बाबा मंदिरात मोहिनी एकादशीचा सण श्रद्धा आणि भक्तीच्या वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. मंगळवारी सकाळी ७ वाजता राणी सती धाम येथून भव्य निशाण यात्रा काढण्यात आली. यामध्ये महिला, पुरुष आणि लहान मुले पारंपारिक वेशभूषेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हातामध्ये मनोकामनांचे 'निशाण' (ध्वज) घेऊन भाविक भक्तीत तल्लीन झालेले पाहायला मिळाले.

ही निशाण यात्रा तहसील कार्यालय, गांधी चौक आणि सिटी कोतवाली चौक मार्गे पुढे सरकली, जिथे डाबकी रोड येथील ओल्ड सिटी परिवाराची निशाण यात्रा देखील यात सामील झाली. त्यानंतर दोन्ही यात्रा भजनांच्या तालावर डोलत मंदिरात पोहोचल्या.



मंदिरात पोहोचल्यावर भाविकांनी श्याम बाबांच्या चरणी निशाण अर्पण करून विधिवत आरती केली. सायंकाळी ७ वाजता महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते, त्यानंतर भजन गायिका कुमारी नेतल यांनी आपल्या भजनांनी वातावरण भक्तिमय करून सोडले.

यानिमित्ताने खाटू श्याम महाराजांचा अतिशय आकर्षक श्रृंगार करण्यात आला होता, ज्याच्या दर्शनासाठी भक्तांची मोठी गर्दी उसळली होती. मंदिर परिसरात भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले, ज्याचा लाभ मोठ्या संख्येने नागरिकांनी घेतला.

# जिल्ह्यात ४० हजार मेट्रिक टन खतसाठा उपलब्ध

प्रतिनिधी २९ एप्रिल

**अकोला :** खरीप हंगामात जिल्ह्यासाठी खतांचे आवंटन कृषी आयुक्तालयामार्फत मंजूर करण्यात आले असून, त्या तुलनेत २६ एप्रिलपर्यंत जिल्ह्यात ४० हजार ५८६ मेट्रिक टन खतसाठा उपलब्ध असल्याची माहिती कृषी विकास अधिकाऱ्यांनी दिली.

पावसाळा सुरू होण्यास केवळ महिनाभराचा कालावधी शिल्लक राहिला आहे. या पार्श्वभूमीवर येत्या खरीप हंगामाचे नियोजन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. त्यामध्ये यंदाच्या खरिपात जिल्ह्यासाठी १ लाख १४ हजार २०० मेट्रिक टन रासायनिक खतांचे आवंटन कृषी आयुक्तालयामार्फत मंजूर करण्यात आले आहे, त्यानुसार जिल्ह्यात खतसाठा उपलब्ध करण्याची तयारी कृषी विभागाकडून केली जात आहे. त्यामध्ये २६ एप्रिलपर्यंत जिल्ह्यात ४० हजार ५८६ मेट्रिक टन खतसाठा उपलब्ध असल्याची माहिती कृषी विकास अधिकारी डॉ. तुषार जाधव यांनी दिली. युरिया ४०९१ मे. टन, डीएपी १३०१ मे. टन, एमओपी ४१५ मे. टन, संयुक्त खते २३४९९ मे. टन, एसएसपी ११२७८ मे. टन.

# अकोल्याच्या रखरखत्या उन्हात खाकीचा कस आणि सराव

## ♦ महाराष्ट्र दिन १ मे साठी पोलिस, होमगार्डची तयारी सुरु

प्रतिनिधी २९ एप्रिल



**अकोला :** शहरातील तापमान ४६ अंशांच्या पार गेलंय. अंगाची लाहीलाही करणाऱ्या या उन्हात सामान्य माणूस सावलीचा आधार शोधतोय, पण लाल बहादूर शास्त्री क्रीडांगणावर मात्र चित्र वेगळंच आहे. तिथे ऐकू येतोय तो फक्त बुटांचा खणखणाट आणि 'परेड'चा शिस्तबद्ध आवाज.

महाराष्ट्र दिनाच्या मुख्य शासकीय सोहळ्यासाठी अकोला पोलीस दलाचे जवान सध्या रक्ताचं पाणी करत आहेत. डोक्यावर आग ओकणारा सूर्य आणि पायाखाली तापलेलं मैदान, अशा दुहेरी संकटातही या जवानांच्या चेहऱ्यावर थकव्यापेक्षा अभिमानाचे भाव अधिक गडद आहेत. १ मे रोजी जेव्हा पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल, तेव्हा त्या काही मिनिटांच्या दिमाखदार पथसंचलनासाठी हे जवान कित्येक तास या 'उष्णतेच्या लाटेत' स्वतःला झिजवत आहेत. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्वतः या तयारीचा आढावा घेतला आहे. केवळ सरावच नाही, तर या जवानांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी क्रीडांगणावर विशेष सोयी करण्यात आल्या आहेत.शास्त्री क्रीडांगणावर केवळ पोलिसांचे पाय थिरकत नाहीयेत, तर त्यासोबत येणाऱ्या चित्ररथांची तयारी आणि प्रशासकीय लगबग अकोलेकरांचं लक्ष वेधून घेत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ७.१० वाजता होणारे ध्वजवंदन आणि त्यानंतर ८ वाजता मुख्य मैदानावरील सोहळा, यासाठी अकोल्याचे पालकमंत्री अॅड. आकाश फुंडकर उपस्थित राहणार आहेत. उष्णतेची लाट अकोल्यासाठी नवीन नाही, पण त्या लाटेवर स्वार होऊन आपल्या राज्याचा गौरव वाढवण्यासाठी सज्ज असलेला हा 'खाकी'चा प्रवास खरोखरच कौतुकास्पद आहे. १ मे रोजी जेव्हा बँडच्या तालावर हे पाऊल पडेल, तेव्हा त्यामागे या रणरणत्या उन्हातील कष्टाची मोठी कहाणी असेल.

# हमी दराने तूर खरेदीस १ मेपर्यंत मुदतवाढ !

प्रतिनिधी २९ एप्रिल

**अकोला :** राज्य शासनाच्या २७ एप्रिलच्या आदेशानुसार सरकारी केंद्रांवर हमी दराने तूर खरेदीसाठी येत्या १ मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे अद्याप तूर विकणे बाकी असलेल्या जिल्ह्यातील तूर उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

बाजारात भाव वाढतील, या अपेक्षेने अनेक शेतकऱ्यांकडील तूर विकणे बाकी आहे; मात्र हमी दराच्या तुलनेत बाजारात कमी भाव मिळत असल्याने प्रतिक्विंटल आठ हजार रुपये हमी दराने सरकारी केंद्रांवर तूर विकण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला असतानाच नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांकडील तूर हमी दराने खरेदी करण्याची मुदत २५ एप्रिल रोजी संपुष्टात आली होती. परंतु शेतकऱ्यांकडील तूर खरेदी होणे बाकी असल्याच्या परिस्थितीत राज्य शासनाच्या आदेशानुसार हमी दराने तूर खरेदीला येत्या १ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार जिल्ह्यात गेल्या ३१ मार्चपर्यंत नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांकडील तूर येत्या १ मेपर्यंत हमी दराने खरेदी करण्यात येणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

# अकोला जिल्ह्यात ॲम्ब्युलन्सच्या मनमानी भाड्यावर लगाम घालण्याची मागणी

वि प्रतिनिधी २९ एप्रिल

**अकोट :** अकोला जिल्ह्यात कार्यरत काही ॲम्ब्युलन्स सेवांकडून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून मनमानी व अवाजवी भाडे आकारले जात असल्याच्या तक्रारी पुढे आल्या असून, यावर तातडीने नियंत्रण आणण्याची मागणी जोर धरू लागली आहे. आपत्कालीन परिस्थितीत पर्याय नसल्याने नागरिकांचे आर्थिक शोषण होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (ठाकरे गट) वैद्यकीय आघाडीचे प्रमुख रोशन शांताराम पर्वतकर यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी, अकोला तसेच राज्याचे आरोग्य मंत्री मा. प्रकाशराव आबिटकर यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. २५ एप्रिल रोजी भ्रमणध्वनीद्वारेही यासंदर्भात निवेदन देण्यात आले होते. निवेदनात जिल्ह्यातील सर्व शासकीय व खाजगी ॲम्ब्युलन्स सेवांसाठी प्रमाणित भाडेदर निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच हे दरपत्रक प्रत्येक ॲम्ब्युलन्समध्ये व संबंधित कार्यालयात ठळकपणे लावणे बंधनकारक करावे, असेही नमूद करण्यात आले आहे. प्रति किलोमीटर दर, प्रतीक्षा शुल्क, ऑक्सिजन व इमर्जन्सी सुविधांचे शुल्क यांची स्पष्ट माहिती देऊन पारदर्शकता आणावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. याशिवाय जादा शुल्क आकारणीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तपासणी यंत्रणा उभारून तक्रार निवारणासाठी हेल्पलाईन सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण अकोला यांनी २८ जुलै २०२० रोजी मंजूर केलेल्या भाडेदरानुसारच आकारणी होत आहे का, याची तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ॲम्ब्युलन्स सेवांवर मोटार वाहन कायद्यानुसार कडक कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. नागरिकांच्या हितासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून ॲम्ब्युलन्स सेवांमध्ये पारदर्शकता व शिस्त आणावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# देवरी फाट्यावर भीषण आगीत मॅक्झिमो गाडी जळून खाक



प्रतिनिधी २९ एप्रिल

**कुटासा:** काल रात्री ९ वाजताच्या सुमारास देवरी फाट्यावरील काट्यांना भीषण आग लागली. या आगीमध्ये एक मॅक्झीमो गाडी व काही टायर जळुन खाक झाल्याची माहिती आहे. आग एवढी भषण होती कि या आगीवर नियंत्रण मिळवने कठीण झाले होते.मात्र गावकऱ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे अखेर या आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले तसेच अग्निशामन दलाने सुद्धा आग विझविण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले मात्र या आगिमध्ये मॅक्झिमो गाडीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.नेमकी ही आग कशामुळे लागली हे समजु शकले नाही.

# पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांना विशेष पुरस्कार

प्रतिनिधी २९ एप्रिल



**अकोला :** महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाकडून अकोला पोलिस दलाच्या 'प्रोजेक्ट रक्षा' ची दखल घेत पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांना राज्यस्तरीय विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे द्वितीय सेवा हक्क दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव होते.

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क अधिनियम २०१५ ची प्रभावी अंमलबजावणी करत नागरिकांना पारदर्शक, वेळेवर आणि विश्वासार्ह सेवा देण्यासाठी अकोला पोलिसांनी 'प्रोजेक्ट रक्षा' हा उपक्रम राबविला. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेली ही प्रणाली १८ सप्टेंबर २०२५ रोजी कार्यान्वित करण्यात आली असून, नागरिकांच्या सेवेत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या उपक्रमांतर्गत प्रत्येक पोलीस ठाण्यात क्यूआर आधारित फीडबॅक प्रणाली उपलब्ध करण्यात आली आहे. नागरिकांना मराठीसह बहुभाषिक स्वरूपात आपला अभिप्राय नोंदवता येतो. हा प्रतिसाद थेट पोलीस अधीक्षक आणि केंद्रीय नियंत्रण कक्षापर्यंत पोहोचती. त्यामुळे तक्रारी दडपल्या जाण्याची शक्यता संपुष्टात आली असून, पोलीस ठाण्यांचे मूल्यांकन नागरिकांच्या समाधानावर आधारित केले जात आहे. 'प्रोजेक्ट रक्षा'मुळे पोलीस व नागरिक यांच्यात विश्वासाचे नवे नाते निर्माण झाले आहे. अकोला जिल्ह्याचा पोलीस स्टेशन परफॉर्मन्स इंडेक्स ७४.२३/१०० इतका असून, आतापर्यंत १० हजार ५०० हून अधिक नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद नोंदविला आहे. नागरिकांना जलद, सुलभ व समाधानकारक सेवा देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे अकोला पोलीस दलाने राज्यात एक आदर्श निर्माण केला आहे. या सन्मानामुळे दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्साह वाढला असून, भविष्यात अधिक गुणवत्तापूर्ण सेवा देण्याची प्रेरणा मिळणार असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

# चौधरी कोचिंग क्लासेसमध्ये मेडिकल आणि इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी !

## ♦ अनेक विद्यार्थी वैद्यकीय अभियांत्रिकी क्षेत्रात भविष्य घडवित आहेत

प्रतिनिधी २९ एप्रिल



**अकोला :** येथील शास्त्री नगर, तोष्णीवाल लेआउट मध्ये स्थित वसीम सर यांची 'चौधरी कोचिंग क्लासेस' ही संपूर्ण विदर्भातील एक नामांकित संस्था आहे. याठिकाणी विद्यार्थ्यांना इंजिनीअरिंग आणि मेडिकल प्रवेश परीक्षांसाठी योग्य मार्गदर्शन आणि मोलाची मदत दिली जाते. आजवर या संस्थेतून प्रशिक्षण घेऊन शेकडो विद्यार्थी वैद्यकीय आणि अभियांत्रिकी क्षेत्रात आपले भविष्य घडवत आहेत.

चौधरी कोचिंग क्लासेसमध्ये मेडिकल व इंजिनीअरिंगची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष दिले जाते. इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी ही एक सुवर्णसंधी आहे. प्रवेश परीक्षेद्वारे पात्र विद्यार्थी १ लाख रुपयांपर्यंतची स्कॉलरशिप मिळवू शकतात. ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी प्रवेश परीक्षा दिली आहे, ते विद्यार्थी १० तारखेच्या आत पुन्हा नाव नोंदणी करू शकतात. विद्यार्थी सकाळी

Wasim Sir's CHAUDHARY COACHING CLASSES
NEET | IIT-JEE | FOUNDATION

१०:०० ते संध्याकाळी ७:०० या वेळेत प्रवेश परीक्षा देऊ शकतात. चौधरी कोचिंग क्लासेसमध्ये केवळ अनुभवी आणि तज्ञ शिक्षकच मार्गदर्शन करतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी येथे खालील सुविधा उपलब्ध आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीचे मूल्यमापन करून त्यावर वैयक्तिक लक्ष दिले जाते.

सुसज्ज लायब्ररी, मॉक टेस्ट, डिजिटल बोर्ड, ऑडिओ-व्हिज्युअल क्लासरूम आणि वाय-फाय सुविधा, संपूर्ण परिसर सीसीटीव्ही देखरेखीत असून, सुरक्षा रक्षक आणि अग्निशमन यंत्रणा उपलब्ध आहे. सुसज्ज प्रयोगशाळा, संगणक लॅब आणि वातानुकूलित वर्गखोल्या, शेकडो विद्यार्थ्यांच्या रिव्ह्यूजच्या आधारे या संस्थेला ५ पैकी ४.४ स्टार रेटिंग मिळाले आहे. 'विद्यार्थी येथे प्रवेश घेऊन आपले डॉक्टर किंवा इंजिनीअर बणण्याचे स्वप्न पूर्ण करू शकतात,' अशी माहिती संस्थेचे संचालक वसीम चौधरी सर यांनी दिली आहे.

# 80 फुट खोल विहिरीतून हरणाला वनविभागाने जीवदान

## ♦ मोरगाव भाकरे येथील मंगळवारी सकाळची घटना

प्रतिनिधी २९ एप्रिल




**अकोला :** २८ एप्रिलला मोरगाव भाकरे येथील अविनाश भाकरे यांच्या शेतातील खोल विहिरीत हरण पडुन होते. त्यांनी वनपाल गजानन गायकवाड यांना सांगितले. वन विभागाने रेस्कु टीमचे सदस्य मानद वन्यजिव रक्षक बाळ काळणे, तुषार आवारे , प्रविण पवार प्रदीप खडे यांना घटनास्थळी पाठवले. विहिरीची खोली व अडगळीची विहिर असल्यामुळे अडचण होती. परंतु अखेर रेस्क्यू ऑपरेशन यशस्वी झाले.

विहिरीची खोली पाहून वैद्यकीय सहाय्यक प्रविण पवार शिडीने खाली उतरले व त्यांनी हरणाला बांधुन वर पाठवले. त्याला पाणी पाजुन निसर्गावस्थेत सोडले. निसर्गाची किमया अशी की कितीही उंचीवरून पडले तरी वन्यजीव सहसा फॅक्चर होत नाहीत . पाण्याच्या व्याकुळतेने वन्यजीव सध्या विहिरीकडे, गावांकडे येण्याचा प्रयत्न करत आहेत . शेतक-यांनी विहिरी पासुन दुर पाणी साठवल्यास ते पाणी पिवुन परत जंगलाकडे जातील. अशा समस्या निर्माण होणार नाहीत असे आवाहन मानद वन्यजीव रक्षक बाळ काळणे यांनी केले

# ज्येष्ठ बांधकाम मजुरांचा शुक्रवारी सन्मान सोहळा

**अकोला :** आंतरराष्ट्रीय कामगार दिन निमित्त बिल्डिंग पेंटर्स व बांधकाम मजूर असोसिएशनच्या वतीने ज्येष्ठ सहकाऱ्यांचा सन्मान सोहळा शुक्रवार, १ मे रोजी आयोजित करण्यात आला आहे. सकाळी ९ वाजता हनुमान चौकजवळ, आपातापा रोड, अकोट रोड, अकोला येथे पार पडणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कामगार नेते शैलेष सुर्यवंशी तर उद्घाटन अकोट फाईलचे पोलिस निरीक्षक जनार्दन खंडेराव यांच्या हस्ते होणार असून प्रमुख मार्गदर्शन वंचित बहुजन आघाडीचे सचिव गजानन गवई करणार आहेत. तसेच मार्गदर्शक म्हणून पंचशिल गजघाटे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास सर्व श्रमिक बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. श्रमिकांचा सन्मान व्हावा हा कार्यक्रमाचा उद्देश आहे. तसेच दरवर्षी सन्मान सोहळा आयोजित करण्यात येतो असे आयोजकांनी कळवले आहे.

उमलत्या कळ्या
वाढदिवस

मो. हुसेन मो. इमरान
रा. आलेगाव

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK